वि. दिवाणी दावा क्र. ९१/२०२०
पारस वि. प्रयागबाई
MHJN020011812020

## निशाणी ४१ वरील आदेश

०१. सदरचा अर्ज निशाणी ३५ वरिल आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी व गुणदोषांवर निकाली काढण्यात यावा या विनंतीसह सादर करण्यात आला आहे.

०२. वादी/अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की त्रयस्थ पक्षाने त्यांना दाव्याकामी पक्षकार म्हणून समाविष्ट करुन घ्यावे म्हणून निशाणी ३५ वर अर्ज दिला होता. दिनांक २७.११.२०२४ रोजी सदर अर्जावर वादीविरुध्द विना म्हणणे आदेश पारित करण्यात आला होता. तो आदेश रद्द करावा यासाठी वादीने निशाणी ३८ प्रमाणे अर्ज दाखल केला होता. परंतु तो अर्ज न्यायालयाने नामंजुर केल्याने निशाणी ३५ गुणदोषावर निकाली लागलेला नाही.

०३. वादींचे पुढे असेही कथन आहे की दावा मिळकतीशी त्रयस्थ ईसमाचा काहीही संबंध नाही. त्यांनी कट कारस्थान रचुन सदरचा अर्ज दिला आहे. वादीचे म्हणणे न ऐकता त्रयस्थ ईसमाचा अर्ज निकाली काढणे म्हणजे वादीवर एकप्रकारे अन्याय आहे. त्यामुळे वादीला त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवून निशाणी ३५ वरिल अर्ज गुणवत्तेवर निकाली काढणे आवश्यक आहे अन्यथा वादींवर अन्याय होईल. म्हणून निशाणी ३५ वर झालेला आदेश मागे घेवून तो अर्ज पुन्हा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

०४. सदर अर्जावर प्रस्तावित प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी असे म्हणणे मांडले आहे की निशाणी ३५ वरिल अर्ज दिनांक ०७.०८.२०२४ रोजी दाखल करण्यात आला होता. त्यावर वादींनी निशाणी ३७ प्रमाणे दिनांक २३.०८.२०२४ व निशाणी ३८ प्रमाणे दिनांक ०४.०९.२०२४ रोजी अर्ज दाखल करुन से दाखल करण्यासाठी वेळ मागुन घेतला. दिनांक २७.११.२०२४ रोजी वादींतर्फे कोणताही अर्ज देण्यात आला नाही व त्याच तारखेला निशाणी ३५ वर वादींविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यानंतर निशाणी ३५ वर आदेश पारित करण्यात आला आहे. आदेश पारित केल्यानंतर दुपारच्या सत्रात ४.३० ते ५.०० वाजण्याच्या सुमारास वादींनी No say order set aside चा अर्ज व सोबत त्यांचे म्हणणे दाखल केले. वास्तविक वादींचा अर्ज येण्यापुर्वीच निशाणी ३५ वर सकाळच्या सत्रात आदेश पारित करण्यात आला होता. वादींना न्यायालयाने म्हणणे दाखल करण्याची पुरेपुर संधी देवूनही वादींनी स्वतःच दिलेल्या संधीची दखल घेतली नाही. निशाणी ३५ वरिल अर्ज हा गुणदोषावर निकाली झालेला आहे. निशाणी ३५ वर वादी विरुध्द म्हणणे नाही आदेश पारित झाल्याचे वादींच्या वकीलांना दिनांक २७.११.२०२४ रोजीच माहिती झाले होते. परंतु त्यांनी सदरचा आदेश बाजुला सारण्यासाठी एक महिन्याच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. परंतु वादींनी याबाबत कोणतेही अर्ज फाटे केले नाहीत अथवा म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.२ ते ४ विरुध्द मेरिट नुसार दावा चालवून वादी त्यांचे कथित अधिकार सिध्द करु शकतो. त्यामुळे वादींना अजुनही दाव्याकामी भरपुर संधी उपलब्ध आहे.

निशाणी ४१ वरिल अर्जात कोणतेही तथ्य नसल्याने तो फेटाळण्यास पात्र आहे.

०५. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. संचिकेचे विशेषतः निशाणी ३५ व त्यावरिल आदेशाचे अवलोकन केले.

०६. निशाणी ३५ वरिल अर्ज त्रयस्थ ईसमांनी त्यांना दाव्याकामी प्रतिवादी क्र. २ ते ४ म्हणून समाविष्ट करुन घ्यावे याकरीता दिवाणी व्यवहार संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे दाखल केला आहे.

०७. निशाणी ३५ वरिल आदेश पारित करतांना न्यायालयाने परिच्छेद क्र.९ मध्ये असे स्पष्ट नमुद केले आहे की त्रयस्थ ईसमांना दाव्याकामी समाविष्ट करुन घेतल्यास वादींनी प्रतिवादींचे वारस म्हणून समाविष्ट केलेला पुंजाराम घोलप याचे कोणतेही नुकसान होणार नाही. मयत प्रयागबाई हिचे वारस कोण आहेत हे प्रलंबित प्रकरणामध्ये निश्चित झाल्यावर त्या अनुषंगाने दाव्यामध्ये बदल करता येवू शकतो. परंतु दाव्याची सदयस्थिती पाहता दिवाणी किरकोळ अर्जाचा निकाल लागेपर्यत प्रकरण प्रलंबित ठेवणे योग्य नाही. अर्ज नामंजुर केल्यास अर्जदारांना त्यांच्या दावा मिळकतीतील हक्क अधिकारापासून वंचित राहावे लागेल व त्यांना दाव्याकामी प्रतिवादी पक्षकार म्हणून समाविष्ट करणे न्यायोचित होईल असे नमुद करुन अर्ज मंजुर करण्यात आला आहे.

०८. निशाणी ३५ वरिल आदेश पारित केल्यानंतर वादीने ४.३० वाजेच्या सुमारास निशाणी ३९ प्रमाणे निशाणी ३५ वर झालेला विना म्हणणे

आदेश रद्द करण्याकरीता अर्ज दाखल केला आहे जो सकाळ सत्रात निशाणी ३५ वर आदेश पारित झाल्यामुळे दफ्तरी दाखल करुन घेण्यात आला आहे. त्यानंतर वादींनी निशाणी ३५ वरिल त्याचे म्हणणे निशाणी ४० वर दाखल केले आहे. परंतु निशाणी ३५ वरिल आदेश पारित झाल्यामुळे वादींनी म्हणणे देखील दफ्तरी दाखल करुन घेण्यात आले आहे.

०९. निशाणी ३५ वर आदेश पारित करतांना न्यायालयाने दाव्यातील कथन, दाव्यातील वाद, प्रतिवादीचे म्हणणे याचा उल्लेख केला आहे. तसेच मयत प्रयागबाई हिच्या वारसांच्या वादाबाबत देखील चर्चा करण्यात आली आहे. निशाणी ३५ वरिल अर्ज वादीच्या म्हणण्याविना निकाली काढण्यात आला असला तरी आदेश पारित करतेवेळेस संचिकेनुसार उपलब्ध असणा–या सर्व वस्तुस्थितीचा विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे निशाणी ३५ वरिल आदेशावर फेरविचार करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करीता आहे.

## आदेश

०१. निशाणी ४१ वरिल अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जाचा खर्च पक्षकारांनी आपापला सोसावा.

DIPALI MANOHAR SHINDE

Digitally signed by DIPALI MANOHAR SHINDE
Date: 2025.03.01 15:25:23 +0530

(**श्रीमती डि. एम. शिंदे**)

दिनांकः– २७.०२.२०२५

५ वे सह दिवाणी न्यायाधीश,
(व. स्तर), जालना.

**वि. दिवाणी दावा क्र. ९१/२०२०**
**पारस वि. प्रयागबाई**
**MHJN020011812020**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी. डी. एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : अनुजा एस. जोशी
न्यायालयाचे नांव : ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर) जालना.
निकाल दिनांक : २७.०२.२०२५

स्वा/-
(अनुजा एस. जोशी)
लघुलेखक